ADFACTORS PR
Knowledge-driven communications


| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | 15 Oct 2018 | Publication: | Punya Nagari (Marathi) |
| Edition: | Mumbai | Page No: | 4 |
| MAV/CCM: | 29106/20.79 | Circulation: | 15479 |


# टीसीएस आयटी विझ २०१८ संपन्न

**मुंबई :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्युशन्स फर्मने आयोजित केलेल्या टीसीएस आयटी विझ २०१८ या शालेय मुलांसाठीच्या सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजुषेत मुंबईतील ८५० हून अधिक शाळांनी सहभाग घेतला. मुंबई पर्वात विविध शाळांमधील २५ संघही सहभागी झाले होते. ८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांमध्ये सक्षम करणाऱ्या तंत्रज्ञान कौशल्यांच्या वाढत्या महत्त्वाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही खडतर स्पर्धा वार्षिक ज्ञान स्पर्धेच्या रूपात चालवली जाते. प्रत्येक शाळा दोन-दोन विद्यार्थ्यांचे कितीही संघ यात पाठवू शकते. यंदाच्या टीसीएस आयटी विझमध्ये टेक ट्रेंड्सचा समावेश होता. ॲनिमेशन सॉफ्टवेअरचा वापर करून गेमिफिकेशनच्या माध्यमातून सादर केलेल्या या टेक ट्रेंडसने प्रेक्षक आणि संघांना जागेवर खिळवून ठेवले. जगभरात प्रचंड परिणाम घडवू पाहणाऱ्या तंत्रज्ञानातील ट्रेंड्सवर या स्पर्धा व्यासपीठात भर देण्यात आला होता. लिखित प्राथमिक फेरीत निवडून आलेल्या पहिल्या सहा संघांना प्रादेशिक अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला होता. प्रादेशिक अंतिम फेरीतील स्पर्धेच्या पाच फेऱ्यांनंतर बॉम्बे स्क्वाटीश स्कूल, पवई या शाळेतील आदित्य अग्रवाल आणि करण नागदेव यांनी विजेतेपद पटकावले. तर, डीएव्ही इंटरनॅशनल स्कूल, खारघर या शाळेतील अर्थ चौहान व अंशुल सोलंकी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.